# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र.१३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५

**दूरध्वनी** २२१६ ३९६४/२२१६ ३९६५ **फॅक्स:** ०२२-२२१६३९७६

**ई-मेल : mercindia@merc.gov.in वेबसाईट www.merc.gov.in**


**जाहिरात क्र. १७/२०२२-२३**

## जाहीर सूचना

## प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०२२ वर महाराष्ट्र राज्यातील जनतेकडून अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागविण्याबाबत

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (मविनिआ किंवा आयोग), मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०२२ चे प्रारुप तयार केले आहे.

२. हे प्रारुप विनियम त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

३. आयोग, वरील प्रारुप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागवित आहे. इच्छुक हितसंबंधितांनी त्यांचे अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५, या पत्त्यावर व्यक्तिश: किंवा पोस्टाने, किंवा ई-मेल : **suggestions@merc.gov.in** द्वारा पाठवाव्यात.

४. **१९ नोव्हेंबर, २०२२ रोजी** किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

दिनांक : २९/१०/२०२२,

ठिकाण : मुंबई

**(अभिजीत देशपांडे)**

**सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**